# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः 10.06.2024** **वारः सोमवार**

---

1.पंतप्रधान नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा देशाच्या पंतप्रधानपदी; 31 कॅबिनेट मंत्र्यांसह एकंदर 72 सदस्यांचा शपथविधी

2.जम्मू-काश्मीरमध्ये भाविकांच्या बसवर दहशतवादी हल्ला, 10 भविकांचा मृत्यू

3.फ्रान्समध्ये मध्यावधी निवडणुकांची राष्ट्राध्यक्ष एमन्युएल मॅक्रोंकडून घोषणा

4.फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेत, पुरुष एकेरीत कार्लोस अल्काराजला विजेतेपद

आणि

5.मॉन्सूनची देशभरात आगेकूच, मुंबई आणि पुण्यात मॉन्सून दाखल

***शपथविधी***

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल देशाचे नवे पंतप्रधान म्हणून शपथ घेतली. पंतप्रधान मोदी सलग तिसऱ्यांदा देशाचे पंतप्रधान झाले आहेत. नवी दिल्लीत, राष्ट्रपति भवनात झालेल्या समारंभात राष्ट्रपति द्रौपदी मुर्मू यांनी त्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. पंतप्रधान मोदी यांच्यासमवेत 31 कॅबिनेट दर्जाचे, 5 राज्य मंत्री-स्वतंत्र कार्यभार आणि 36 केंद्रीय राज्यमंत्र्यांना देखील राष्ट्रपतींनी पद आणि गोपनीयतेची शपथ दिली.

वरिष्ठ भाजपा नेते राजनाथ सिंह, अमित शाह, नितीन गडकरी, डॉक्टर एस. जायशांकर, पीयूष गोयल, धर्मेंद्र प्रधान, निर्मल सीतारामन आणि भाजपा अध्यक्ष जे. पि. नड्डा यांच्यासह पक्षाचे ज्येष्ठ नेते किरेन रिजिजू, प्रल्हाद जोशी, गिरीराज सिंह, अश्विनी वैष्णव, ज्योतिरादित्य सिंधिया, भूपेंद्र यादव, गजेंद्र सिंह शेखावत, अन्नपूर्णा देवी, हरदीप सिंग पुरी, डॉ मनसुख मांडविया, जी. किशन रेड्डी आणि सी. आर. पाटील, डॉ वीरेंद्र कुमार आणि जुल ओराम यांनी देखील कॅबिनेट मंत्री म्हणून शपथ घेतली. माजी मुख्यमंत्री शिवराज सिंह चौहान, मनोहरलाल खट्टर आणि सर्बानंद सोनोवाल यांनी तसंच, कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री आणि जेडीएसचे खासदार एच.डी. कुमारस्वामी, बिहारचे माजी मुख्यमंत्री आणि हिंदुस्तानी आवाम मोर्चा पक्षाचे प्रमुख जितेन राम मांझी, संयुक्त जनता दलाचे खासदार राजीव रंजन सिंह, तेलुगू देसम पक्षाचे खासदार किंजरापू राम मोहन नायडू आणि लोक जनाशक्ती पक्ष – रामविलास गटाचे प्रमुख चिराग पासवान यांनी देखील कॅबिनेट मंत्री म्हणून शपथ घेतली. भाजप नेते राव इंद्रजित सिंग, डॉ जितेंद्र सिंह

आणि अर्जुनराम मेघवाल तसंच शिवसेनेचे प्रतापराव जाधव आणि राष्ट्रीय लोक दल  पक्षाचे प्रमुख जयंत चौधरी यांनी राज्यमंत्री - स्वतंत्र कार्यभार  म्हणून शपथ घेतली.

याच समारंभात 36 राज्यमंत्र्यांनी देखील पद आणि गोपनीयतेची शपथ घेतली. यात, जितीन प्रसाद, श्रीपाद येसो नाईक, पंकज चौधरी, नित्यानंद राय, क्रिशन  पाल, व्ही. सोमणा, एस. पी. सिंह बघेल, शोभा करंदलाजे, सुरेश गोपी, रक्षा खडसे, अज्या टमटा, बंडी संजय कुमार, कमलेश पासवान, हर्ष मल्होत्रा, सतीश दुबे आणि रवनीत सिंग बिट्टू, रिपब्लिकन पक्ष आठवले गटाचे रामदास आठवले, रामनाथ  ठाकूर, अनुप्रिया पटेल, डॉ. पी. चंद्रशेखर यांचा समावेश होता.

नव्या मंत्री मंडळात अनेक नव्या चेहऱ्यांनाही संधी देण्यात आली असून यामध्ये राज्यातल्या तीन मंत्र्यांचा समावेश आहे. पुण्याचे खासदार मुरलीधर मोहोळ,

बुलडाण्याचे शिवसेनेचे प्रतापराव जाधव तसंच रावेरच्या खासदार रक्षा खडसे यांनी काल केंद्रीय राज्यमंत्रिपदाची घेतली शपथ.

या शपथविधी सोहळ्याला शेजारील देश तसंच हिंदमहासागर क्षेत्रातील अनेक नेते उपस्थित होते. श्रीलंकेचे राष्ट्रपती रानिल विक्रमसिंघे, मालदीवचे राष्ट्रपती डॉ. मोहम्मद मुइज्जू, सेशेल्सचे उपराष्ट्रपती अहमद अफिफ, बांगलादेशच्या पंतप्रधान शेख हसीना, मॉरिशसचे पंतप्रधान प्रविंद कुमार जुगनाथ, नेपाळचे पंतप्रधान पुष्प कमल दहल 'प्रचंड' आणि डॉ. भूतानचे पंतप्रधान शेरिंग तोबगे या समारंभाला उपस्थित होते. याशिवाय, उपराष्ट्रपति जगदीप धनखर, देशाचे सरन्यायाधीश डॉ. डी.वाय. चंद्रचूड यांच्यासह काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, बिहारचे मुख्यमंत्री आणि संयुक्त जनता दलाचे अध्यक्ष नितीश कुमार, आंध्र प्रदेशचे प्रस्तावित मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू, उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, मणिपूरचे मुख्यमंत्री एन बीरेन सिंग, हरियाणाचे मुख्यमंत्री नायबसिंग सैनी, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि  अजित पवार, उद्योगपति मुकेश अंबानी, गौतम अदानी  यांच्यासह अभिनेते अक्षय कुमार आणि शाहरुख खान देखील या समारंभाला उपस्थित होते.

दरम्यान, नव्या कॅबिनेट मंत्रिमंडळाची पहिली बैठक आज संध्याकाळी होण्याची शक्यता आहे.

***जम्मू-काश्मीर-दहशतवादी हल्ला***

जम्मू आणि काश्मीरमधील रियासी जिल्ह्यातील तेर्याथ गावाजवळ काल संध्याकाळी भाविकांना घेऊन जाणारी बस दरीत कोसळल्याने दहा  यात्रेकरू ठार तर 33 जण जखमी झाले आहेत. या बसवर दहशतवाद्यांनी  केलेल्या गोळीबारात बस चालक जखमी होऊन त्याचं बसवरील नियंत्रण सुटलं आणि बस दरीत कोसळली, असं  रियासीचे वरिष्ठ पोलिस अधीक्षक मोहिता शर्मा यांनी सांगितलं.  ही  बस शिवखोरी गुंफा येथून कटरा येथे परतत होती. जखमींना तेरियाथ, रियासी आणि जम्मू येथील रुग्णालयात दाखल करण्यात आलं  आहे.

दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जम्मू-काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांच्याशी संपर्क साधून परिस्थितीचा आढावा घेतला आणि जखमीना आवश्यक ती  सर्व वैद्यकीय सुविधा आणि मदत देण्याचे निर्देश दिले. राष्ट्रपति द्रौपदी मुर्मू , केंद्रीय मंत्री अमित शहा आणि राजनाथ सिंह  यांनी या हल्ल्याचा निषेध केला आहे. यात्रेकरूंना घेऊन जाणाऱ्या बसवर झालेला दहशतवादी हल्ला हे निर्घृण कृत्य असून, मानवतेविरुद्ध गुन्हा आहे आणि त्याचा तीव्र शब्दात निषेध केला पाहिजे असं राष्ट्रपतींनी आपल्या संदेशात म्हंटलं आहे.

जम्मू आणि काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांनी देखील या दशतवादी  हल्ल्याचा तीव्र निषेध केला असून, हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांच्या कुटुंबियाप्रती शोक व्यक्त केला आहे. हल्ला झालेल्या परिसराची नाकेबंदी करण्यात आली असून, हल्ला करणाऱ्या दहशतवाद्याचा शोध घेण्यासाठी जम्मू काश्मीर पोलिसांसह सुरक्षा दलांनी संयुक्त मोहीम उघडली असल्याचं त्यांनी सांगितलं.

***फ्रांसनिवडणूक***

फ्रान्सचे पंतप्रधान इम्यानुयल मैक्रॉ यांनी काल दूरचित्रवाणीवरून देशात मध्यावधी निवडणूकांची घोषणा केली. नुकत्याच झालेल्या यूरोपियन संघाच्या निवडणुकीत मैक्रॉ यांचे विरोधी, मरीन ले पेन यांच्या नेशनल रैली पार्टीला मोठा विजय मिळण्याची शक्यता एक्झिट पोलमध्ये वर्तवण्यात आल्यामुळे त्यांनी मध्यावधी निवडणुका जाहीर केल्याचं बोललं  जात आहे. या निवडणुका येत्या 30 जून आणि 7 जुलै अशा दोन टप्प्यात होतील अस मैक्रॉ यांनी जाहीर केलं. निवडणूकपूर्व सर्वेक्षणात इम्यानुयल मैक्रॉ यांच्या विरोधी पक्षाला 32 टक्के मतं  मिळण्याची शक्यता वर्तवण्यात आली असून ती मैक्रॉ यांच्या रिनसा पक्षापेक्षा दुप्पट आहेत.

***पंतप्रधान-उद्योगक्षेत्र अभिनंदन***

फिक्की आणि असोचेम  या उद्योग क्षेत्रातील संघटनांनी तिसऱ्यांदा देशाच्या पंतप्रधानपदाची धुरा हाती घेतल्याबद्दल नरेंद्र मोदी यांचं अभिनंदन केलं आहे. केंद्रातील स्थिर सरकारमुळे देशाची आर्थिक स्थिति आणखी मजबूत होईल तसंच असं फिक्की ने म्हंटलं आहे.

नव्या सरकार कडून, आर्थिक आणि सामाजिक विकासाला चालना देणारी प्रगतीशील धोरणं आणि उपाययोजना करण्यात येतील अशी फिक्की ला आशा असून, ही धोरण 'विकसित भारता'चा मजबूत पाया तयार करतील असं,फिक्की  चे अध्यक्ष डॉक्टर अनिश शाह यांनी म्हंटलं आहे.
उद्योग, व्यापार आणि वित्तीय बाजारपेठेतील संपूर्ण परिसंस्था सरकारच्या नव्या सुरुवातीमुळे पुन्हा उत्साहीत  झाली आहे, असं एसोचेमचे अध्यक्ष संजय नायर म्हणाले.

***केरळ-अधिवेशन***

केरळ विधानसभेच्या 11 व्या अधिवेशनाला आजपासून सुरुवात होत आहे. 28 दिवस चालणाऱ्या या अधिवेशनात 2024-25 च्या अंदाजपत्रकातील अनुदानित मागण्यांवर विस्तृत चर्चा होण्याची शक्यता आहे.

हे अंदाजपत्रक गेल्या फेब्रुवारी महिन्यात सादर करण्यात आलं होतं. 25 जुलै रोजी अधिवेशनचा समारोप होईल. या अधिवेशनात केरळ पंचायती राज संशोधन विधेयक तसंच केरळ नगरपालिका संशोधन विधेयकं देखील सादर केली जाण्याची शक्यता आहे.

आंध्र प्रदेशमध्ये, प्रस्तावित मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू 12 जून रोजी शपथ घेणार आहेत.

***फ्रेंचओपनटेनिस***

पॅरिस इथं सुरू असलेल्या फ्रेंच ओपन टेनिस स्पर्धेत काल पुरूष एकेरी गटात, स्पेनच्या कार्लोस अल्काराज गरफिया याने आपलं पहिलं विजेतेपद पटकावलं. त्याने जर्मनीच्या ॲलेक्झांडर झ्वेरेव याचा 6-3, 2-6, 5-7, 6-1, 6-2 अशा सेट मध्ये पराभव केला. या विजायमुळे, अल्काराज, वयाच्या 21 व्या वर्षी, 1990च्या दशकात जन्मलेल्या अन्य खेळाडूपेक्षा सर्वात जास्त ग्रँड स्लॅम विजेतेपदं पटकावणारा सर्वात तरुण आणि एकमेव खेळाडू ठरला आहे. तसच खुल्या टेनिस स्पर्धेत महत्वाच्या तीन मैदानांवर विजेतेपद मिळवणारा जगातील दूसरा टेनिसपटू ठरला आहे.

***मान्सून***

नैऋत्य मोसमी पावसाची आगेकूच सुरू असून, काल तो, मध्य अरबी समुद्र आणि उत्तर अरबी समुद्राच्या भागात सक्रिय झाल्याचं हवामान विभागाने म्हंटल आहे. नैऋत्य मोसमी पावसाने काल महाराष्ट्राच्या अनेक भागात प्रवेश केला असून, मुंबईत साधारणतः 11 जूनला अपेक्षित असणारा मान्सून, दोन दिवस आधीच दाखल झाला असल्याचं हवामान खात्याने सांगितलं. पुण्यात देखील मान्सूने दमदार हजेरी लावली आहे. दरम्यान, आज राज्यात पुणे, सातारा, सोलापूर, उस्मानाबाद, लातूर, अहमदनगर, नाशिक, औरंगाबाद, नंदुरबार, जळगाव , धुळे आणि बीड जिल्ह्यात जोरदार पावसाची शक्यता असून हवामान विभागाने या जिल्ह्यात ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सातारा आणि कोल्हापूर जिल्ह्यात आज मुसळधार ते अति मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागाने दिला आहे.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.